**<u>प्रेस रिलीज</u>**

**" भारतात मुलांसाठी सुरक्षित जागांच्या दिशेने"**

**मुंबई**

**ऑक्टोबर ७,८ आणि ९, २०१५**

भारताच्या २०११ च्या जणगणने नुसार भारतात मुलांची संख्या हि एकूण लोकांख्येच्या ३९ % इतकी आहे. हि आकडेवारी लक्षात घेता मुलांच्या संदर्भातील वेगवेगळ्या मुद्यांना गांभीर्याने पाहण्याची गरज निर्माण होत आहे. मुलांचे शोषण आणि मुलांसाठी सुरक्षित जागा हे दोन्ही मुद्दे भारतातील प्रत्येक स्थरातील, राज्यातील मुलांनवर परिणाम घडवून आणणारे आहेत. महिला व बाल विकास मंत्रालयाद्वारे करण्यात आलेल्या सर्वेक्षणानुसार, ५० % हुन जास्त मुलांना एक किंवा अधिक शोषणाला सामोरे जावे लागते. शोषण व मुलांसाठी सुरक्षित जागांची कमतरता यामुळे मुलांच्या सर्वांगीण विकासावर वाईट परिणाम होताना दिसून येतो. यामुळे त्यांना मानसिक, शारीरिक आणि सामाजिक परिणामांना सामोरे जावे लागते.

याच संदर्भात, युवा मुंबई व टेरेस देस होम्स जर्मनी यांच्या संयुक्त विद्यमाने " भारतात मुलांसाठी सुरक्षित जागांच्या दिशेने" या राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन ७,८ आणि ९ ऑक्टोबर, २०१५ ला करण्यात आले आहे. ह्या कार्यशाळेत भारतातील १२ राज्यातून विविध संस्था व संघटनांचे प्रतिनिधित्व करणारी ५२ मुले सामील होतील.

सदर कार्यशाळेत ७ व ८ ऑक्टोबर, २०१५ रोजी मुलांसोबत चार सत्र घेण्यात येतील. ज्यामध्ये पहिल्या दिवशी कविता नायर भाटीया आणि स्मिता झांस्कर यांच्या मार्फत "काय चूक आहे?- शोषणाला ओळखणे" आणि "शांततेला तोडणे-शोषणाच्या विरुद्ध बोलणे" या विषयांवर मुलांसोबत सत्र घेतले जाईल. ८ ऑक्टोबर,२०१५ ला "भय का?- सुरक्षित व असुरक्षित जागा" आणि "आपण बदल कसा घडवून आणू शकतो? - समाजातील सुरक्षित जागा निर्माण करणे" या संदर्भात प्रमोद निगुडकर आणि विकास सावंत हे मुलांशी चर्चा करतील. सदर कार्यशाळेत भारतीय चित्रपट सृष्टीतील प्रख्यात कलाकार रणजीत दानिया हे आपल्या रंगानी प्रत्येक सत्रातील मुलांच्या प्रतिक्रियांना कागदावर रेखाटून बोलके करण्याचा प्रयत्न करतील. सदर कार्यशाळा terre des hommes या संस्थेच्या भारतातील सामाजिक संस्थाना त्यांच्या कार्यास योगदानाची ४० वर्ष पूर्ण करत असल्याच्या निमित्ताने आयोजित करण्यात येत आहे. याचेच अवचीत्य साधून त्यांच्यामार्फत पूर्ण महिना मुलांसोबत व युवकांसोबत संपूर्ण भारत भरात असे कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.

कार्यशाळेचा समारोप हा ९ ऑक्टोबर २०१५ रोजी यशवंतराव चावण प्रतिष्ठान, नरीमन पोइंट येथे जाहीर कार्यक्रमात होईल. सदर कार्यक्रमात मुलांनी कार्यशाळेमध्ये चर्चेतून व त्यांच्या अनुभवातून तयार केलेल्या मुलांच्या सुरक्षित जागांसाठीच्या घोषणापत्राचे अनावरण केले जाईल. हे घोषणापत्र महाराष्ट्र महिला व बाल विकास मंत्रालयाला मुलांच्या मार्फत सुपूर्त केले जाईल. सदर कार्यक्रमात शासकीय अधिकारी, बाल कल्याण समिती सदस्य, मुलांच्या संदर्भात कार्य करणारे कार्यकर्ते सहभागी होतील. कार्यक्रमाची सांगता ही मालवणी विभागातील युवक सांस्कृतिक कार्यक्रमामधून मुलांच्या शोषणाविषयी जनजागृती करून करतील. त्यानंतर मुले पत्रकारांशी संवाद साधतील.

**कार्यशाळा" भारतात मुलांसाठी सुरक्षित जागांच्या दिशेने"**

दिनांक: ७ व ८ ऑक्टोबर २०१५ वेळ: सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.००

स्थळ: युवा सेंटर, प्लॉट २३, सेक्टर ०७, खारघर, नवी मुंबई, महाराष्ट्र

**"भारतातील मुलांच्या सुरक्षित जागांसाठीचे मुलांचे घोषणापत्र" अनावरण सोहळा व जाहीर सोहळा**

दिनांक: ९ ऑक्टोबर २०१५ वेळ: सकाळी १०.०० ते दुपारी १.३०

स्थळ: रंगस्वर हॉल, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, नरीमन पोइंट, चर्चगेट, मुंबई
**पत्रकारांशी संवाद: दुपारी १ वाजता (मुले व बाल अधिकाराशी संबंधित कार्यकर्ते व संस्था)**
सदर कार्यशाळेचे व जाहीर सोहळ्याचे वेळापत्रक व संकल्पना सोबत जोडत आहोत.
आपणास विनंती आहे की, आपण आपल्या पत्रकार मित्रांना सदर कार्यक्रमाविषयी कळवावे व आणखी लोकांपर्यंत मुलांच्या सुरक्षे संदर्भातील हा विषय पोहोचवावा.